# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**


**No,CGRF/AZ/U / 181 / 2009 / 15 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Kuldip Chander Kashyap, Plot No.554, N-3, CIDCO, Aurangabad.**
**Consumer No. 490010490925**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Kuldip Chander Kashyap, Plot No.554, N-3, CIDCO, Aurangabad.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance within 15 days from the date of receipt of this letter along with related documents.**

**The hearing in this matter is kept on 25/02/2009 at 12=30 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
**Shri Kuldip Chander Kashyap,**
**Plot No.554, N-3, CIDCO,**
Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८१/२००९/१५**

**तक्रार दाखल दिनांक ;- ०७/०२/२००९**
**निकाल दिनांक ;- ०६/०४/२००९**

**श्री कुलदिप चंदर कश्यप,**
**प्लॉट नबर ५५४, एन-३ ,**
**सी.आय.डी.सी.ओ,**
**औरंगाबाद.**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०७/०२/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५/०२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना ऑगस्ट २००२ ते ऑक्टोबर २००२ तसेच ऑगस्ट २००३ ते ऑक्टोबर २००३ या काळात चुकीच्या वाढीव बिलाची आकारणी करण्यात आली होती. त्यांनी याबाबत केलेल्या तक्रारीवर महावितरण कडुन कोणतीही कारवाई करण्यात आली नाही त्यामुळे त्यांना अनेकवेळा पार्ट पेमेंट म्हणुन वीज बिल भरावे लागले. महावितरण कंपनीतर्फे बिल दुरुस्ती करुन देण्यात येत नसल्यामुळे त्यांना देण्यात येणा-या वीज बिलात व्याज व दंड रक्कम लावण्यात आली आहे. महावितरण कंपनीस व्याज व दंड न आकारता सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे. त्याचप्रमाणे या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात येवु नये असा अंतरिम आदेश पारीत करण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक २५/०२/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री कश्यप उपस्थित होते. महवितरणतर्फे नोडल अधिकारी श्री राठैार तसेच चिकलठाणा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री वायकोस उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या जवाबानुसार फेब्रुवारी २००३ मध्ये अर्जदारास मीटर बदलविण्यात आले या आधारे ४८५० युनिट वीज वापराचे रुपये २५०५०.८३/- चे चुकीचे वीज बिल आकारण्यात आले.पण प्रत्यक्षात मीटर बलल्यागेले नसल्यामुळे त्यांना पुढील वीज बिलात २१६२९.००/- रुपये क्रेडीट देण्यात आले. सी.पी.एल.मध्ये नोंद न झाल्यामुळे फेब्रुवारी

२००४ मध्ये २८७७१.००/-रुपयाचे क्रेडीट पुन्हा देण्यात आले असल्याचे त्यांनी आपल्या जवाबात म्हटले आहे.ग्राहकाने वीज बिल नियमित पण भरले नसल्यामुळे त्यांना व्याज व दंड आकारण्यात आले असल्याचे त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे.

३) महावितरण कंपनीकडुन अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आल्याचे आढळून आल्यामुळे अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होईपर्यत त्यांचा वीज पुरवठा खंडित न करण्याचे अंतरिम आदेश नोडल अधिकारी यांना देवुन मंचाने याप्रकरणाची पुढील तारीख ०३/०३/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक ०३/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदार यांचे वीज बिल रिव्हजन करुन देण्याची तयारी दर्शविली.अर्जदाराने बिल रिव्हीजन करतांना व्याज व दंड न आकारण्याची विनंती केली व सुधारीत वीज बिल भरण्याची तयारी दर्शविली.मंचाने नोडल अधिकारी यांना यापुर्वी करण्यात आलेले बिल रिव्हीजन,स्थळ पाहणी अहवाल,मीटर बदली अहवाल व नवीन बिल रिव्हीजन प्रस्ताव पुढील सुनावणीच्यावेळी मंचात करण्यात करण्याचा आदेश दिला व पुढील सुनावणी दिनांक ०७/०३/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक ०७/०३/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी मंचाने मागणी केलेले कागदपत्रे दाखल केली तसेच २००८ पर्यंत लावण्यात आलेले व्याज रुपये १२५९१/-कमी करण्याची तयारी दर्शविली.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन व मंचासमोर झालेल्या सुनावणीवरुन असे आढळुन येते की, महाविरतण कंपनीतर्फे अर्जदारास घरगुती वापरासाठी वीज पुरवठा करण्यात आला असुन ऑगष्ट २००२ पर्यंत अर्जदारास मीटर क्रमांक १०४३४७०६ नुसार वीज वापराचे देयक देण्यात येत होते व याकालावधीपर्यंत वीज बिलाबाबत कोणताही वाद नव्हता.ऑक्टोबर २००२ मध्ये अर्जदाराचे वरील मीटर बदली करुन नवीन १२३०७४८ या क्रमांकाचे मीटर बसविण्यात आल्याचे दर्शवित नंतरच्या काळात सतत चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आली.माहे फेब्रुवारी २००३ व माहे फेब्रुवारी २००४ मध्ये अर्जदाराचे बिल दुरुस्त करुन त्यास अनुक्रमे रुपये २१६२९/- व २८७७१/-रुपयाचे क्रेडीट देण्यात आल्याचे सी.पी.एल.वरुन दिसुन येते.दिनांक ०५/०५/२००४ रोजी अर्जदाराचे जुने मीटर क्रमांक १०४३४७०६ बदलण्यात आले व जागी नवीन मीटर क्रमांक ४५९३७ बसविण्यात आले. मीटर बदलतांना जुन्या मीटर वरील अंतिम वाचन १२२९४ व नवीन मीटरवरील चालु रिडींग ००१ अशी असल्याचे मीटर बदली अहवालावरुन स्पष्ट होते.यावरुन ऑगस्ट २००२ ते ०५/०५/२००४ या कालावधीत अर्जदाराचा एकुण वीज वापर १२२९४-४०७५=८२१९ युनिट असा असल्याचे स्पष्ट होते.त्याप्रमाणे ०५/०५/२००४ ते डिसेंबर २००८ या काळात ४५९३७ या क्रमांकाचे मीटर कार्यरत असल्यामुळे त्यावरील रिडींग प्रमाणे अर्जदाराचा एकुण वीज वापर ७४८२-०१= ७४८१ युनिट असल्याचे स्पष्ट होते.नोडल अधिकारी यांनी देखील अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आले असल्याचे मान्य केले आहे व व्याज,दंड कमी करण्याची तयारी दर्शविली आहे.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर अर्जदाराने चुकीच्या वीज बिलाबाबत मंचात दाखल केलेली तक्रार योग्य असल्याचे दिसुन येते.

मंच या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास ऑगस्ट २००२ ते ०५/०५/२००४ या काळासाठी ८२१९ युनीट वीज वापराचे तसेच ०५/०५/२००४ ते डिसेंबर २००८ या कालावधीसाठी ७४८१ युनीट वीज वापराचे बिल विभागुन अर्जदारास ३० दिवसाच्या आत सुधारीत बिल द्यावे.

२) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात अर्जदारास कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

३) वरील प्रमाणे सुधारीत बिल देतांना अर्जदाराने वरील काळात भरलेल्या रक्कमेची वजावट सुधारीत वीज बिलातुन करावी .

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१८१/२००९/१५** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री कुलदिप चंदर कश्यप,**
**प्लॉट नबर ५५४, एन-३,**
**सी.आय.डी.सी.ओ, औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१८१/२००९/१५ )

आपण दिनांक ०७/०२/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**